बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn.

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्रला राजभाषेचा

## सर्वोच्च " कीर्ती पुरस्कार " प्रदान

**पुणे दिनांक १९ सप्टेंबर २०२२ :** सुरत, गुजरात येथे, दिनांक १४ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या एका शानदार व दिमाखदार समारंभात भारत सरकारच्या गृह मंत्रालयातर्फे देण्यात येणारा राजभाषा वापरासाठीचा प्रतिष्ठित व सर्वोच्च असा कीर्ती पुरस्कार हा देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रला प्रदान करण्यात आला. " राजभाषेचे प्रभावी कार्यान्वयन " व " सर्वोत्तम अंतर्गत मासिक पत्रिका " या दोन वेगवेगळ्या वर्गवारीमध्ये बँकेला हा सर्वोच्च प्रतिष्ठेचा कीर्ती पुरस्कार बहाल करण्यात आल. केंद्रीय गृह व सहकार मंत्री मा. श्री अमित शाह हे या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाला सुरवात होण्यापूर्वी बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी केंद्रीय गृह व सहकार मंत्री मा. श्री अमित शाह तसेच केंद्रीय गृह राज्यमंत्री श्री निशीथ प्रामाणिक व श्री अजय कुमार मिश्रा यांचा सत्कार केला. गुजरात राज्याचे मुख्यमंत्री श्री भूपेंद्रभाई पटेल व अन्य मान्यवर देखील या प्रसंगी उपस्थित होते.

बँक ऑफ महाराष्ट्रच्या मनुष्यबळ व्यवस्थापन व राजभाषा विभागाचे सरव्यवस्थापक श्री के राजेश कुमार यांनी " राजभाषेचे प्रभावी कार्यान्वयन " या वर्गवारीमध्ये तर बँक ऑफ महाराष्ट्रच्या राजभाषा विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ राजेंद्र श्रीवास्तव यांनी " सर्वोत्तम अंतर्गत मासिक पत्रिका " या वर्गवारीमध्ये राज्यसभेचे माननीय उपसभापती श्री हरिवंश नारायण सिंह यांचे हस्ते पुरस्कार स्वीकारला.

शासकीय कार्यालये, उपक्रम व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे देशभरातील उच्चाधिकारी देखील या कार्यक्रमास उपस्थित होते. " राजभाषेचे प्रभावी कार्यान्वयन " व " सर्वोत्तम अंतर्गत मासिक पत्रिका " या दोन वेगवेगळ्या वर्गवारीमध्ये बँकेला हा सर्वोच्च प्रतिष्ठेचा कीर्ती पुरस्कार प्रथमच प्राप्त झाला आहे.

**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn.



**छायाचित्रात : ( डावीकडून उजवीकडे ) बँक ऑफ महाराष्ट्रच्या मनुष्यबळ व्यवस्थापन व राजभाषा विभागाचे सरव्यवस्थापक श्री के राजेश कुमार , केंद्रीय गृह राज्यमंत्री श्री अजय कुमार मिश्रा , राज्यसभेचे माननीय उपसभापती श्री हरिवंश नारायण सिंह व केंद्रीय गृह राज्यमंत्री श्री निशीथ प्रामाणिक .**